
**मुस्लिम समाजाला शिवीगाळ करणाऱ्या आणि समाजावर बिनबुडाचे आरोप लावणाऱ्या गोपीचंद पडळकरांच्या उपस्थितीत होणाऱ्या मेळाव्यास मुस्लिम समाजातील ओबीसी समाज पडळकरांच्या मांडीला मांडी लावून बसण्यासाठी उपस्थित राहणार का?**

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- गुरूवार दि.१६ ऑक्टोबर २०२५ पाने ४ किंमत ३

### बीडच्या पुढील रेल्वे कामाला येणार आता जोरदार गती, शरद पवारांचे थेट रेल्वे मंत्र्यांना पत्र

# आ.संदीप क्षीरसागरांनी शरद पवारांकडे रेल्वेच्या कामाला गती देण्याची केली मागणी



Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्हावासियांच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळ्याच्या असलेल्या बीड- नगर- परळी रेल्वे मार्गातील पहिला टप्पा बीड ते नगर पुर्ण झाला असला तरी शिरूर कासार आणि बीड तालुक्यातील रेल्वे विषयी ग्रामस्थांच्या अनेक अडचणी समोर येऊ लागल्या आहेत. या प्रश्नी आ.संदीपभैय्या क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली.

रेल्वे मार्गाच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणी, भुयारी मार्ग, पुलांची दुरूस्ती, रूंदीकरण यासह इतर मुद्यांची मांडणी आ.क्षीरसागर यांनी पवारांकडे केली असुन पवार साहेबांनी स्वत: केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना याबाबत पत्र दिले आहे. स्वत: शरद पवार यांनी बीडच्या रेल्वेत लक्ष घातल्याने आता अनेक प्रश्न सुटतील अशी अपेक्षा आहे. बीडचे आ.संदीपभैय्या क्षीरसागर यांनी राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची मुंबईत भेट घेऊन बीड मतदार संघातील शिरूर आणि बीड तालुक्यात रेल्वेच्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या अडचणी पवार साहेबांसमोर मांडल्या. आ.संदीपभैय्यांनी मांडलेल्या अडचणींची दखल घेत शरद पवार यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना दि.१४ ऑक्टोबर २०२५ रोजी पत्र दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्रातील अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गावर असलेल्या अनेक रेल्वे भुयारी मार्ग आणि पुलांच्या दुरुस्ती, रुंदीकरणाच्या तातडीच्या गरजेकडे मी तुमचे लक्ष वेधू इच्छितो. हे भुयारी मार्ग आणि पूल स्थानिक रस्ते जोडणीचा एक महत्त्वाचा भाग आहेत, ज्यामुळे रेल्वे मार्गालगतच्या गावांमध्ये आणि शहरांमध्ये वाहतूक सुलभ होते. तथापि, अपुरा ड्रेनेज आणि वाहनांचा भार वाढल्यामुळे यापैकी अनेक संरचना कालांतराने खराब झाल्या आहेत, ज्यामुळे वारंवार पाणी साचते, वाहतूक कोंडी होते आणि जनतेसाठी सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण होत आहेत. विशेषत: आहेर धानोरा-वरवटी रोड रेल्वे पूल, पोखरी पूल, बाकरवाडी पूल, ढेकणमोहा तांडा पूल, मौज पूल, बाभळखुंटा पूल, मौजे जरुड पूल, शिवणी रोड पूल, वांगी रोड पूल आणि त्याच मार्गावरील इतर लहान क्रॉसिंग याठिकाणी अनेक अडचणी येवू लागल्या आहेत. या सर्व बाबी लक्षात घेता, मंत्रालयाला विनंती की, त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना संपूर्ण अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाची सखोल तपासणी करण्याचे, कमतरता ओळखण्याचे आणि लवकरात लवकर योग्य ती दुरुस्ती करण्याचे निर्देश द्यावेत अशी मागणी खा.शरद पवार यांनी केली आहे.

# तहसिलदार अन् पोलिसांचा मुजोरपणा

## दिव्य वार्ताच्या दौलावडगावचे प्रतिनिधी एका गरीब पत्रकाराच्या घरावर बुलडोजर फिरवत घर केले जमिनदोस्त

### महाराष्ट्र मुस्लिम पत्रकार फाउंडेशनच्या वतीने या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षकांकडे मागणी



दौलवडगाव , (दिव्य न्युज):- आष्टी तहसीलदार मॅडम यांच्या आदेशानुसार आणि अंभोरा पोलीस स्टेशनच्या संरक्षणाखाली दौलवडगाव येथील स्थानिक पत्रकार कासम कय्युम शेख यांच्या राहत्या घरावर कोणतीही पूर्वसूचना, नोटीस किंवा सुनावणी न देता बुलडोजर चालविण्यात आला. या अचानक झालेल्या कारवाईमुळे शेख यांचे संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले असून ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

स्थानिक सूत्रांनुसार, ही कारवाई राजकीय दबावाखाली व राजकीय सूडबुद्धीने करण्यात आली असल्याचा आरोप करण्यात येत आहे. पत्रकार शेख हे गेल्या काही दिवसांपासून ग्रामपातळीवरील काही गैरव्यवहार आणि शासकीय कामांमधील अनियमितता यावर प्रकाश टाकत होते. त्यामुळेच प्रशासनावर दबाव आणून त्यांच्यावर अन्याय्य कारवाई करण्यात आली, असा ग्रामस्थांचा आरोप आहे.पत्रकार शेख यांनी सांगितले की,माझ्या घरावर कोणतीही नोटीस न देता थेट बुलडोजर चालवण्यात आला. ही कारवाई पूर्णपणे बेकायदेशीर आहे. आम्ही प्रशासनाकडे आणि जिल्हाधिकारी कार्यालयात याबाबत लेखी तक्रार देणार आहोत. आमच्या कुटुंबावर अन्याय झाला आहे.

या घटनेनंतर गावात प्रशासनाविरोधात रोष वाढला असून सामाजिक संघटना आणि पत्रकार संघटनांनी या प्रकरणाची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.दरम्यान, काही नागरिकांनी सांगितले की, उत्तर प्रदेशमध्ये ज्या पद्धतीने प्रशासन बुलडोजर कारवाई करून नागरिकांना दडपण्याचे प्रयत्न करत आहे, त्याच पद्धतीने आता महाराष्ट्रातही अल्पसंख्याक समाजावर अन्याय होत असल्याचे दिसून येत आहे.या घटनेने पत्रकार सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, प्रशासनाची भूमिका याबाबत स्पष्टीकरण देणे गरजेचे ठरत आहे.

# नेकनूर जिल्हा परिषद सर्कल मधील मतदारांना अपेक्षित असणारा नवा चेहरा संजय शिंदे मैदानात

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारीसाठी प्रमुख दावेदार



नेकनुर, (दिव्य न्युज):- नेकनूरच्या राजकारणातील थोरल घराणं म्हणून ज्यांची ओळख आहे त्या घराण्यातील माजी जिल्हा परिषद सदस्य कै. बबनदादा शिंदे यांचे पुतणे संजय शिंदे मागील काही वर्षापासून राजकारणात प्रत्यक्ष सक्रीय झालेले आहेत. त्यांचा पूर्व अनुभव हा समाजकार्याचा असल्याने आणि घरात राजकारण असल्याने मोठा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. संघटन, प्रभावी वक्तृत्व, अभ्यासू, कर्तुत्वान, प्रेमळ स्वभाव, निस्वार्थी आणि एकनिष्ठ असे गुण त्यांच्या अंगी आहेत. अशा विविध गुण कौशल्यांनी भरलेले नेतृत्व नेकनूर जिल्हा परिषद निवडणुकीत पूर्ण तयारीने मैदानात उतरलेले आहे. त्यांनी सामाजकार्याचा आखाडा महाराष्ट्रभर गाजवलेला आहे. राज्य सरकारचे पाणी आणि शेती या विषयात उत्कृष्ट केल्याबद्दल राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्या हस्ते राज्यस्तरीय तीन पुरस्कार मिळालेले आहेत.

समाजकार्यात पुणे विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी (चडथ) घेऊन त्यांनी गेली २३ वर्ष महाराष्ट्रातील विविध १८ जिल्ह्यात पाणी, शेती आणि महिला सक्षमीकरण ▶▶ पान २ वर

# बीडमध्ये राष्ट्रवादीत गटबाजी उफाळणार

## डॉ.योगेश क्षीरसागरांना अमरसिंह पंडितांचे आवाहन



बीड (दिव्य न्युज):- आगामी नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये गटबाजी उफाळून येण्याची दाट शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या डॉ. योगेश क्षीरसागर यांना पक्षातीलच माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या गटाकडून मोठे आव्हान मिळत असल्याचे चित्र आहे.विधानसभा निवडणुकीत खुद्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हस्तक्षेप करून क्षीरसागरांना असलेला अंतर्गत विरोध शांत केला होता. मात्र, पराभवानंतर ही गटबाजी पुन्हा सक्रिय झाली आहे. अमरसिंह पंडित गटाचे अमर नाईकवाडे, फारूक पटेल यांच्यासह अनेक प्रमुख नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांच्यापासून दूर असून, काही माजी नगरसेवकही पंडित गटाच्या संपर्कात आहेत. त्यामुळे बीड पालिकेवर दीर्घकाळ वर्चस्व असलेल्या क्षीरसागर कुटुंबासाठी ही निवडणूक सोपी नसेल, असे राजकीय तज्ज्ञ दाखल झाल्यानंतर गटबाजीचे चित्र स्पष्ट होईल.

### अजित पवारांसमोर डोकेदुखी

राष्ट्रवादीतील या दोन गटांमुळे बीडची सूत्रे कोणाकडे सोपवायची, हा मोठा प्रश्न अजित पवार यांच्यासमोर आहे. डॉ. योगेश क्षीरसागर हे बीड विधानसभा प्रमुख असले तरी पंडित गटाचा विरोध त्यांना त्रासदायक ठरू शकतो. गेवराईबालेकिल्ला असलेले पंडित अलीकडच्या काळात बीड शहरात चांगलेच सक्रिय झाले आहेत.

### महायुतीत बिघाडीचे संकेत

पक्षांतर्गत विरोधासोबतच, महायुतीतील भाजप आणि शिंदे गट शिवसेनाही राष्ट्रवादीपासून अंतर राखून आहेत. शिवसेनेतील काही पदाधिकाऱ्यांनी क्षीरसागरांवर उघड नाराजी व्यक्त केली आहे. हे दोन्ही पक्ष युतीऐवजी स्वतंत्र गट तयार करून दोन्ही क्षीरसागर बंधूंचा (योगेश आणि संदीप) सामना करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे.

### नगराध्यक्षपदासाठी उमेदवारांचा शोध

बीड नगराध्यक्षपद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव असूनही, महायुती किंवा महाविकास आघाडीकडे अद्याप कोणताही ठोस उमेदवार चेहरा नाही.शहरवासीयांच्या सोयी - सुविधांबाबतची नाराजी, गटबाजी आणि जातीय समीकरणे यामुळे बीड नगरपालिकेची आगामी निवडणूक अत्यंत अटीतटीची होणार आहे.




### राजकीय समीकरणे व मराठा आरक्षण

पराभवानंतर डॉ. योगेश क्षीरसागर आणि त्यांच्या पत्नी डॉ. सारिका क्षीरसागर यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती आणि आंदोलनातही सहभाग घेतला होता. दुसरीकडे, भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी मंगळवारच्या सभेत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे महायुतीच्या उमेदवारांना निवडणुकीत फटका बसण्याची शक्यता राजकीय तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

## मतदारांत संभ्रमः रहिवाशी एका वार्डाचा अन् यादीत नाव गेले दुसऱ्या वार्डात

# बीड शहरामध्ये मतदार यादीत गोंधळ, ४५० आक्षेप दाखल

## एसडीओ कविता जाधव निर्णय घेणार, आक्षेपासाठी उद्यापर्यंत मुदतवाढ



**बीड, (दिव्य न्युज)ः- बीड नगरपालिकेची प्रारूप मतदार यादी ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झाली असून शहरातील सर्व २६ प्रभागांमध्ये मतदार यादीत मोठ्या प्रमाणावर गोंधळ झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अनेक ठिकाणी रहिवासी एका भागातील असूनही त्यांचे नाव दुसऱ्याच वॉर्डात नोंदवले गेलें आहे. आक्षेप घेण्याची मुदत १३ ऑक्टोबरपर्यंत होती. मात्र, आक्षेपांची संख्या वाढत असल्याने आता १७ ऑक्टोबरपर्यंत आक्षेप नोंदवता येणार आहेत. आतापर्यंत प्रारूप मतदार यादीवर तब्बल ४५० आक्षेप दाखल झाले आहेत.**

या आक्षेपांवर सुनावणी घ्यायची की नाही, याचा निर्णय उपविभागीय अधिकारी कविता जाधव या घेणार आहेत. त्यांची प्राधिकरण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बीड पालिकेत दाखल झालेल्या आक्षेपांची स्थळपाहणी सध्या सुरू आहे. नगरपालिकेचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर इच्छुक उमेदवार जागे झाले आहेत. वॉर्डरचना झाल्यानंतर अनेकांनी आक्षेप घेतले होते. त्यावर -सुनावणी घेऊन निर्णय झाला. दाखल झालेल्या ४५० आक्षेपांमध्ये अनेक तक्रारी या एकगठ्ठा आहेत. एका-एका वॉर्डातील हजारो नागरिकांची नावे दुसरीकडे गेलेली आहेत.

### स्थळपाहणी करून अहवाल सादर करणार

प्रारूप मतदार यादी जाहीर झाली आहे. ज्यांना आपल्या राहत्या वॉर्डात नाव नाही, असे वाटत असेल, त्यांनी १७ ऑक्टोबरपर्यंत आक्षेप नोंदवावेत. आमचे अधिकारी स्थळपाहणी करून अहवाल सादर करत आहेत. अंतिम निर्णय प्राधिकरण अधिकारी कविताजाधुव घेतील.

**– शैलेश फडसे, मुख्याधिकारी, नगरपालिका**

### जवळपास १ हजार ७६३ जणांचा वॉर्ड बदलला

काही१.७६३ नागरिकांचा वॉर्ड बदलला वॉर्ड क्र. २१ मधील १,७६३ नागरिकांनी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीमध्ये वॉर्ड क्र. २१ मध्येच मतदान केले. मात्र आता या मतदारांची नावे ही वॉर्ड क्र. २६ मध्ये आली आहेत. पालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून झालेल्या या चुका दुरुस्त व्हाव्यात यासाठी आम्हीआक्षेप नोंदवला आहे

**–इम्रान शहा, नागरिक**

### हक्काच्या वॉर्डात मतदान करण्यासाठी खटाटोप सुरू

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवार आपल्या वॉर्डातील मतदार दुसऱ्या ठिकाणी असल्यास त्याला आपल्या वॉडर्डात घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यामुळे आक्षेपांची संख्या अधिक वाढली आहे. मतदार यादीत गोंधळ हा केवळ बीड पालिकेत झाला नसून जिल्ह्यातील सर्वच नगरपालिकांत झाल्याने सर्वत्र आक्षेप नोंदवणे सुरू आहे. त्यामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

### प्रत्येक बॉर्डामध्ये दोन अधिकारी, कर्मचारी नियुक्त

प्रारूप मतदार यादीवर आलेल्या आक्षेपांची खातरजमा करण्यासाठी पालिकेकडून स्थळपाहणी सुरू आहे. त्यासाठी शहरातील २५ वॉडीसाठी प्रत्येकी २ अधिकारी, कर्मचारी नेमण्यात आले आहेत. त्याशिवाय चार प्रभागांसाठी प्रत्येकी १ परिवेक्षक नियुक्त केला असून या संपूर्ण प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी ३ सदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. सर्व पथके संबंधित मतदारांच्या पत्त्यावर प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करणार आहेत. या अहवालावरूनच प्राधिकरण अधिकारी एसडीओ कविता जाधव यांच्याकडून अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

# गुणरत्न सदावर्तेंच्या दोन्ही पायाला, हाताला प्लास्टर

## हाणामारीनंतरचा रुग्णालयातील फोटो व्हायरल

मुंबई , (दिव्य न्युज)ः- मुंबई एसटी को-ओपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत काल (बुधवारी) मोठा राडा झाला. अॅड.गुणरत्न सदावर्ते आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेतील कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या हाणामारीचा व्हिडिओ देखील समोर आला होता. दरम्यान, या घटनेच्या काही तासानंतरच सदावर्ते यांच्या दोन्ही दोन्ही पाय आणि दोनही हाताला प्लास्टर केल्याचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.



या फोटोमध्ये सदावर्ते हे रुग्णालयातील बेडवर झोपलेले दिसत आहेत. त्यांच्या दोन्ही हात आणि पायाला प्लॅस्टर असून त्यांना सलाईन देखील लावण्यात आलेली आहे. त्यांच्या पत्नी अॅड.जयश्री पाटील या देखील या फोटोमध्ये दिसत आहेत. दरम्यान, या फोटोच्या सत्यतेची पुष्टी आम्ही करत नाही.या फोटोवर नेटकऱ्यांनी उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. जे झाले ते अयोग्य आहे असे काही नेटकरी म्हणत आहेत तर, या मारहाणीनंतर सदावर्तेंना काही नेटकऱ्यांनी ट्रोल केले असून ते नाटक करत असल्याचेही म्हटले आहे. राज ठाकरेंसोबत फोटो असलेल्या आनंद सोनी यांच्या अकाऊंटवरून हा फोटो शेअर करण्यात आला आहे. दरम्यान, काही नेटकऱ्यांनी हा फोटो खरा नसून एआयच्या माध्यमातून तयार केला असल्याचे म्हटले आहे.

एसटी बँकेचे संचालक संतोष राठोड यांनी सांगितले की, एसटी बँकेत कोट्यावधीचा गैरव्यवहार झाला आहे. आम्ही त्याची तक्रार सहकार आयुक्त आणि अध्यक्षांकडे केली आहे. कोट्यवधीचा गैरव्यवहार हा सदावर्ते हे करत असून बैठीत झालेला गोंधल आणि हल्ल्यामागे सदावर्तेंचा हात आहे.एसटी बँकेचे सदावर्ते पॅनलचे संचालक संजय घाटगे यांनी सांगितले की, बैठकीत विरोधी संचालकांनी महिलांचा अपमान केला. मंगळसुत्र तोडण्याचा प्रयत्न केला. कपडे फाडण्यात आले, जातीवाचक बोलले गेले. वारंवार महिलांचा अपमान करण्यात आला.

## पुण्याचे प्रसिद्ध येवले अमृततुल्य अडचणीत

# एक चूक महागात पडणार?

मुंबई, (दिव्य न्युज)ः- महाराष्ट्रात मागील काही वर्षांत चहामध्ये सर्वाधिक लोकप्रिय ठरलेला बँड म्हणजे येवले अमृततुल्य. उत्तम चवीसह मोठमोठ्या दुकानांमुळे चहाचा हा ब्रँड राज्यात चांगलाच गाजला. मात्र ही कंपनी आता अडचणीत आली आहे. अनेक जुन्या चित्रपटांचे स्वामित्व हक्क असलेल्या शेमारू एंटरटेन्मेंट कंपनीच्या तक्रारीवरून सोमवारी येवले अमृततुल्य कंपनी आणि कंपनीच्या संचालकांविरोधात एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. संचालकांनी कंपनीच्या व स्वतःच्या सोशल मीडिया अकाऊंटवरून परवानगी न घेता एका चित्रपटातील क्लिप प्रसारित केल्याचा आरोप शेमारू कंपनीकडून तक्रारीत करण्यात आला आहे.




याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अनेक जुन्या चित्रपटांचे स्वामित्व हक्क असलेल्या शेमारू कंपनीने मागील आठवड्यात केलेल्या दोन तक्रारींनंतर काल सोमवारी आणखी तीन तक्रारी केल्या आहेत. शेमारू कंपनीकडे 'गोलमाल', 'फिर हेराफेरी' यासह अनेक चित्रपटांचे स्वामित्व हक्क आहेत. असं असताना येवले कंपनीने परवानगी न घेता या चित्रपटांमधील काही प्रसंग घेऊन 'मिम' तयार केले व आपल्या ब्रँडच्या व्यावसायिक फायद्यासाठी समाजमाध्यमांवर पसरवल्याचा आरोप करण्यात आला आहे. शेमारू कंपनीच्या ही बाब लक्षात आल्यानंतर शेमारूने येवले कंपनीला जानेवारी महिन्यात नोटीस पाठवून संबंधित चित्रपटांचे स्वामित्व हक्क आपल्याकडे असून मिम तातडीने हटवा, असं सूचित केलं होतं. परंतु तरीही येवले कंपनीने मिम हटवले नाहीत. त्यामुळे आमचं ५० लाख रुपयांचे नुकसान झालं, असा दावा शेमारू कंपनीने तक्रारीत केल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.

दरम्यान, 'गोलमाल' व 'फिर हेराफेरी' या चित्रपटांतील काही भाग, क्लिप, रिल्स व पोस्टर पोस्ट करून सुमारे ५० लाख रुपयांची कमाई केल्याचा शेमारू कंपनीकडून आरोप करण्यात आला आहे. शेमारू कंपनीच्या तक्रारीनंतर एमआयडीसी पोलिसांकडून कंपनीसह नवनाथ येवले, मंगेश येवले, गणेश येवले, नीलेश येवले व तेजस येवले यांच्याविरुद्ध प्रतिलिपी अधिकार अधिनियमासह भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ वरून

## नेकनूर जिल्हा परिषद

विषयात समाजकार्य केलेले आहे. शरदचंद्र पवार यांच्या विचाराशी सन २००५ पासून जोडलेले आहेत आणि सुप्रियाताई सुळे यांच्या नव महाराष्ट्र अभियान सोबत जोडलेले आहेत. मागील काही वर्षापासून प्रत्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षातून कार्याला सुरुवात केलेली आहे. त्यांनी जिल्हा परिषद निवडणूक लढविण्याची जोरदार तयारी केलेली आहे. प्रेमळ स्वभाव, हुशार, अभ्यासू, कर्तुत्वान, तत्वनिष्ठ, एकनिष्ठ, सर्वसमावेशक चेहरा अशी त्यांची ओळख आहे. त्यांच्याकडे काहीही नसतांना काम करणारा तरुण म्हणून सर्वत्र परिचित आहेत. थोडक्यात कोणतेही राजकीय पद किंवा सत्ता नसतांना कोणतेही अवघड काम सहज सोपे करून देणारा. कामाची हातोटी एवढी जबरदस्त आहे की, कोणतेही काम सहज सोपे आणि कमी वेळेत करून देतात. तसेच नियमित शेतकरी कष्टकरी यांच्यासाठी काम करणारे महाराष्ट्रभर परिचित आहेत. जमेची बाजू म्हणजे नेकनूर सर्कलमध्ये त्यांच्या हिंद संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपनी माध्यमातून सात हजार शेतकऱ्यासोबत संबंध तयार झालेले आहेत. तसेच महिला सक्षमीकरण कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला बचत गटाचे जाळ त्यांनी विणलेले आहे. महिलांसाठी विविध उद्योग व्यवसाय प्रशिक्षण, शिलाई मशीन वाटप असे कार्यक्रम घेतलेले आहेत. विशेष म्हणजे त्यांचे नेकनूर सर्कलमध्ये मोठे नाते संबंध आणि मित्र परिवार मोठा असून लहान वयातच त्यांना बबनदादा यांच्याकडून राजकारणाचे धडे मिळालेले आहेत. वयाच्या १६ वर्षापासून बुतची जबाबदारी त्यांनी पार पाडलेली आहे. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, विधानसभा, लोकसभा निवडणूक बूत नियोजन ते प्रचार अशा धुरा त्यांनी सांभाळलेल्या आहेत. प्रत्येक विषयाची अभ्यासपूर्ण आणि प्रभावी मांडणी यामुळे जनतेतून त्यांच्याच नावाला पसंती येत आहे. त्यांचा अभ्यास व कार्याची दखल घेऊन दूरदर्शन सह्याद्रीवरील शेती आणि पाणी या विषयात अर्ध्या तासाच्या अभ्यासपूर्ण मुलाखती झालेल्या आहेत व त्या खूप गाजलेल्या आहेत. त्यांचे लिखाण अग्रोवन सारख्या दैनिकातून आणि इतर नामांकित विविध वृत्त पत्रातून प्रसिद्ध झालेले आहे. गाव गावच्या समस्या त्यावर उपाय आणि कृती कार्यक्रम त्यांनीच करावेत. थोडक्यात गावच्या समस्यांचे सर्वे, त्याचे आराखडे तयार करणे आणि त्यासाठी लागणारी निधी तरतूद अशी कार्य त्यांनी शासना सोबत राहून राबविलेली आहेत. त्यामुळे असा अनुभवी, कृतीशील नेतृत्व या बालाघाटाला लाभलेले आहे. नक्कीच राजकीय पटलावर ठसा उमटवल्या शिवाय राहणार नाही. पक्ष नक्कीच अशा नेतृत्वाला संधी देईल.

# मध्यरात्री चोरट्यांची शेतकऱ्याला बेदम मारहाण; दागिने ओरबडल्याने महिलेचा कान फाटला

कडा , (दिव्य न्युज)ः-आष्टी तालुक्यात बिबट्याच्या दहशतीने शेतकरी आधीच भयभीत असताना, आता चोरट्यांच्या वाढत्या हिंमतीमुळे नागरिक अधिकच धास्तावले आहेत. अंभोरा पोलीस ठाणे हद्दीतील अरणविहरा येथे मध्यरात्री दोनच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दोन शेतकऱ्यांच्या घरात घुसून वृद्ध दाम्पत्याला बेदम मारहाण केली आणि ३ तोळे सोने व रोख १३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

अरणविहरा येथील नवनाथ जाधव आणि रावसाहेब जाधव या दोन शेतकऱ्यांची घरे अर्धा किलोमीटर अंतरावर आहेत. नेहमीप्रमाणे जेवण करून गाढ झोपलेल्या या कुटुंबांना लक्ष्य करत चोरट्यांनी मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास बंद घराचे दार तोडून आत प्रवेश केला. घरात ठेवलेले सोने आणि पैसे लुटल्यानंतर त्यांनी कुटुंबातील वृद्धांना धमकावले. वृद्ध दाम्पत्याने याला विरोध करताच, चोरट्यांनी अमानुषपणे त्यांना मारहाण केली. दागिने ओरबाडून घेत असताना महिलेच्या कानातील दागिने काढताना तिचा कान तुटला आणि नाकालाही गंभीर दुखापत झाली. पुरुषांनाही बेदम मारहाण करण्यात आली. दरम्यान, गंभीर जखमी शेऊबाई नवनाथ जाधव, नवनाथ नारायण जाधव यांच्यावर अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या घटनेमुळे परिसरात चोरट्यांची दहशत निर्माण झाली असून, बिबट्याप्रमाणेच आता चोरटेही आपली 'गाव' बदलून दहशत माजवत असल्याचे दिसत आहे. बिबट्याच्या भीतीमुळे शेतकरी एकीकडे शेतात जाण्यास कचरत असताना, दुसरीकडे घरातही असुरक्षितता निर्माण झाली आहे. सरपंच अण्णासाहेब शिरसाठ यांनी तात्काळ चोरट्यांचा बंदोबस्त करून परिसरात पोलिसांची गस्त वाढवण्याची मागणी केली आहे. घटनेची माहिती मिळताच अंभोरा ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांच्यासह पथकाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन तपासाला सुरुवात केली आहे. एकीकडे हिंस्त्र पशू तर दुसरीकडे निर्दयी चोरटे, या दुहेरी संकटात नागरिकांनी जगायचे कसे?



# केज येथील रास्ता रोको प्रकरणी बाळराजे आवारेसह ३३३ जणांविरुद्ध गुन्हा

केज, (दिव्य न्युज)ः- कोरडेवाडी येथील साठवण तलावास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे यासह इतर मागण्यासाठी छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे बाळराजे आवारे पाटील यांच्यासह ग्रामस्थांनी मंगळवारी केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात साडेचार तास रास्ता रोको आंदोलन केल्याप्रकरणी ३३३ जणांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मंगळवारी दुपारी छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे बाळराजे आवारे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुभाष रसाळ, अमोल भिमराव पाटील, योगेश शिवाजी मनेरी (दोघे रा. कोरडेवाडी), संदिप चाळक (रा.लव्हुरी), संभाजी आघाव, विशाल कुटे (दोघे रा. परभणी), अण्णासाहेब जाधव (रा. परळी वै.), संतोष प्रल्हाद यादव, मदन आश्रुबा यादव, विक्रम अभिमान शिंदे, उस्मान मोहम्मद शेख, दत्ता यादव, दादाराव हिम्मत कोरडे, अनिल कोरडे, बाबा शेख, गंगाधर अप्पा यादव, बळीराम भिमराव यादव, मारुतित्रिंबक तेरवे, अशोक धोंडीबा वरपे, सुदाम नागोराव कोरडे, संजय जालींदर गिरी, संतोष वेताळ, पप्पु जयवंता शिंदे, बाजीराव बाबुराव कोरडे, हुसैन अमिन शेख, प्रमोद राजेंद्र कोरडे, शरद नारायण कोरडे, अशोक विष्णु यादव, उमेश शिवाजी वरपे, धनराज दादाराव वरपे, अशोक बन्सी यादव (सर्व रा. कोरडेवाडी) यांच्या कोरडेवाडी गावातील २०० ते ३०० महिला व पुरुषांनी रास्ता रोको आंदोलन केले. त्यांना आंदोलनापासुन अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. व्यंकटराम, तहसीलदार राकेश गिड्डे, पोलीस निरीक्षक स्वनिल उनवणे, जलसंपदा खात्याचे अधिकारी कमलाकर ढाकणे यांनी परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी आंदोलन चालू ठेवून आंदोलना दरम्यान बाळराजे आवारे पाटील व इतर ५ ते ६ जणांनी त्यांचे अंगावर डिझेल ओतूनन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करीत प्रशासनास वेठीस धरण्याचा प्रयत्न केला. तर स्वप्निल वरपे याने विष प्राशान करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. तर बाळराजे आवारे पाटील यांनी तुमची भुमीका जाहीर करा नाही तर आम्ही १० मिनिटात आमचा निर्णय घेवु, गनीमी कावा करु असे म्हणत आंदोलनकर्त्यांसह ५ वाजता तहसिल कार्यालयात जाऊन बसले. तर येणारी - जाणारी वाहने अडवून पादाचारी लोकांची अडवणुक करुन विनापरवाना रास्तारोको केला. अशी तक्रार फौजदार सुकुमार बनसोडे यांनी वरील ३३३ लोकांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल आहे.

रास्ता रोको आंदोलन करीत असतना संदिप चाळक (रा.लव्हुरी), विशाल कुटे (रा. परभणी) या दोघांनी रास्तारोको आंदोलन दरम्यान महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मालकीच्या लातूर - पाटोदा (एम. एच. १४ एमएच १५५९), अहमदपूर - चाळीसगाव (एम. एच. १४ एमएच ६५२२), उदगीर - गंगापूर (एम. एच. १४ एमएच ८९३८), गंगाखेड - आळंदी (एम. एच. १४ बीटी ३९६४), (एम. एच. २० बीएल २१०८) या बसच्या समोरील काचावर दगडफेक करून १ लाख रुपयांचे नुकसान केले. तर बसमधील चालक वाहन आणि प्रवासी यांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होणारी कृती केली. धारूर एसटी बस आगाराचे प्रमुख नवनाथ चौरे यांच्या फिर्यादीवरून बाळराजे आवारे पाटील, संदीप चाळक, विशाल कुटे या तिघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे हे तपास करीत आहेत.